**नियमित दिवाणी दावा क्रमांक ४७/२०२०**
**निशाण क्र. ५९**

**(साक्षीदाराचा जबाब गुगल मिटद्वारे व्हीडीओ कॉलवरुन घेण्यात येत आहे. सदर व्हीडीओ कॉलची लिंक पिठासनावरील संगणक, मा. नागपुर येथील साक्षीदार हजर असलेल्या न्यायालयास व या न्यायालयातील वादी व प्रतिवादी विधीज्ञ यांना पुरविण्यात आलेल्या संगणक यांना पाठविण्यात आलेली आहे. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०४ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – प्रशांत अनंता खंदारे,
**वय** – ५५ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (सहा. रासायनिक विश्लेषक),
**सध्या नेमणुक –** नागपुर प्रयोगशाळा, जि. नागपुर.

**सरतपास – वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. के. एस. सहस्त्रबुध्दे यांचेकडून –**

**०१.** मी सध्या सहा. रासायनिक विश्लेषक म्हणुन नागपुर वैज्ञानिक प्रयोगशाळेत कार्यरत आहे. माझे शिक्षण एम.एस.सी. ऑर्गेनिक केमीस्ट्री झाले आहे. मी १४ वर्षांपासुन सहा. रसायनिक विश्लेषक म्हणुन कार्यरत आहे. मी यापुर्वी वेगळया विभागात कार्यरत असताना न्यायालयात साक्षीदार म्हणुन साक्ष दिली आहे. दिनांक ११ जुन २०१९ कोल्हापुर येथील रासायनिक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडुन आम्हाला सिलबंद असलेला स्टीलचा एक डबा लॉक असलेला पत्रासह प्राप्त झाला होता. सदर पत्राची प्रत मी यापुर्वी या न्यायालयात साक्षीसाठी आलो असताना न्यायालयात हजर केली होती. (त्याची सहा. अधिक्षक, आस्थपना देवरुख यांनी पडताळीत केलेली प्रत अभिलेखावर दाखल असल्याचे म्हणणे वादी विधीज्ञांनी सादर केले). *(साक्षीदाराला निशाणी क्र. ५७ कडील*

*कागदपत्रांच्या यादीसोबत दाखल केलेल्या दस्ताची पडताळीत प्रत दाखविण्यात आली). ती तीच आहे. त्यावर कोल्हापुर वैज्ञानिक प्रयोगशाळेचे सहा. रासायनिक विश्लेषक डॉ. ए. एस. कुदळे व कोल्हापुर वैज्ञानिक प्रयोगशाळेचे विभागीय प्रमुख यांची स्वाक्षरी आहे. तसेच सदर पत्राच्या खालील बाजुस आमच्या मुंबई वैज्ञानिक प्रयोगशाळेतील विभागीय प्रमुख आर. आर. पवार यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांच्या सोबत काम केले असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यातील मजकूर बरोबर आहे (सदर* ***दस्ताला निशाणी ६०*** *देण्यात येते).*

**०२**. सदर पत्रासोबत कोल्हापुर वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना देण्यात आलेले रासायनिक विश्लेषण अहवाल मिळणेबाबतचे पत्र त्यासोबत होते. *(साक्षीदाराला दिनांक ०७/०२/२०१९ रोजीचे पोलीस निरीक्षक, संगमेश्वर पोलीस ठाणे यांचेकडील कोल्हापुर वैज्ञानिक प्रयोगशाळा यांना देण्यात आलेले पत्राची पडताळीत प्रत दाखविण्यात आली). ती तीच आहे. त्यावर पोलीस निरीक्षक, संगमेश्वर पोलीस ठाणे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर योग्य आहे.*

*(सदर दस्ताला निशाणी क्रमांक देण्यास प्रतिवादी तर्फे विधीज्ञां यांनी हरकत घेतली की, सदर दस्तावर त्यांची सही नसल्याने त्यास निशाणी क्रमांक देता येणार नाही.*

*त्यावर वादीतर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, सदरचे पत्र हे संबंधीत पोलीस ठाणे कोल्हापुर प्रयोगशाळेला दिले होते. तेच पत्र कोल्हापुर प्रयोगशाळेकडुन मुंबई प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. त्यामुळे, सदर दस्तावर प्रस्तुत साक्षीदाराची सही असल्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे, त्यास निशाणी क्रमांक देता येऊ शकते.*

*दोन्ही बाजूंचा युक्तीवाद व साक्षीदाराचे साक्षीतील कथन पाहिले असता, सदर*

*साक्षीदाराने त्यांना सदरचे पत्र हे कोल्हापुर प्रयोगशाळेकडुन पाठविण्यात आल्याचे दिसुन येते. तसा मजकुर साक्षीदाराने कथन केला आहे. त्यामुळे, त्यास निशाणी क्रमांक देण्यास कोणताही अडथळा नाही. सबब, आक्षेप नामंजुर). (सदर **दस्ताला निशाणी ६१** देण्यात येते).*

**०३**. सदर मुद्देमाल प्राप्त झाल्यानंतर तो विभाग प्रमुख यांच्याकडे देण्यात येवुन तो कपाटामध्ये सुरक्षीतरीत्या ताब्यामध्ये ठेवण्यात येतो. त्यानंतर अनुक्रमांकानुसार प्रत्येक मुद्देमाल हा रासायनिक विश्लेषणासाठी विभाग प्रमुख हे सहा. रासायनिक विश्लेषक यांना देतात. त्यानंतर सहा. रासायनिक विश्लेषक हे विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली मुद्देमालाचे रासायनिक विश्लेषण करतात. माझ्याकडे प्रस्तुत मुद्देमालाचा स्टीलचा डबा दिल्यानंतर *लॉक ॲण्ड की* याने तो मी उघडला. त्यामध्ये असलेल्या पाकीटात सोने सदृश्य दागिने होते. सदर सोने सदृश्य दागिन्यांमध्ये कानवेल, ब्रेसलेट, चैन, बांगडया अशाप्रकारचे दागिने होते. त्या सर्वांचे वर्णन मी लिहुन घेतले. त्यानंतर मी त्याचे रासायनिक विश्लेषण चालु केले. आमच्या प्रयोगशाळेमध्ये Energy Dispersive X-ray Fluorescence नावाचे उपकरण (Instrument) आहे. सदरचे उपकरण हे धातुचे विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येते. सदर उपकरण वापरुन कोणकोणत्या प्रकारचे धातु आहेत, धातुचे वर्गीकरण केले जाते व मुद्देमालामध्ये धातुचे प्रमाण किती आहे इत्यादी सर्व निदर्शनास येते. सुरुवातीस आम्ही सदरचे उपकरण व्यवस्थीत कार्य करण्याच्या अवस्थेत आहे किंवा नाही, याची आम्ही कॉपर फॉईल वापरुन Calibration करुन पाहणी करतो. सदरचे Calibration व्यवस्थीत आल्यानंतर आम्ही नमुना मुद्देमाल रासायनिक विश्लेषणासाठी घेतो. सदरचा धातु मुद्देमाल आम्ही Energy Dispersive X-ray Fluorescence या उपकरणात ठेवतो. त्यानंतर त्याचे विश्लेषण सुरु होते.

**०४**. प्रस्तुत मुद्देमालातील सर्व दागिन्यांची पाहणी करुन प्रत्येक दागिना मी

Energy Dispersive X-ray Fluorescence या उपकरणात ठेवला. त्यानंतर त्याचे विश्लेषण करण्यात आले. सदर विश्लेषण हे सोने धातुसाठी करण्यात आले होते. परंतु, सदर उपकरणाद्वारे त्याचे विश्लेषण केल्यानंतर त्यामध्ये सोने धातु आढळुन आला नाही. त्यामध्ये तांबे, झिंक, निकेल हे धातु आढळुन आले. धातु Energy Dispersive X-ray Fluorescence या उपकरणात ठेवल्यानंतर उपकरणातील X-ray हा त्या धातुवर Strike होतो. त्यानंतर धातु मधील इलेक्ट्रॉन Release होतो. त्यानंतर तो Higher Energy State मध्ये जावुन स्थीर होतो. Higher Energy Level मधुन तो पुन्हा धातुच्या Inner Shell मधील रिकाम्या जागेत जावुन तो स्थीरावतो. त्यामुळे Energy Release होते. ती Energy Fluorescence या स्वरुपात येते. त्यानंतर Fluorescence Detect होतो. त्यामध्ये किती धातु कोणत्या प्रमाणात आहे, हे त्यानुसार कळते. त्यानुसार आम्ही आलेख रेखाटतो. त्यामध्ये धातुचे प्रमाणे किती टक्के आहे, हे त्या आलेखामध्ये आम्ही नमुद करतो. सदरच्या बाबी आलेखामध्ये दर्शवुन तसा अहवाल आम्ही लिखीत स्वरुपात तयार करतो. तसा अहवाल मी याकामी दिला आहे. तो मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदाराला निशाणी क्र. ५२ कडील कागदपत्रांच्यायादीसोबत अनुक्रमांक ०२ कडील अहवालाची पडताळीत प्रत दाखविण्यात आली). तो तोच अहवाल आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यामध्ये टेबलमध्ये वर्गीकरण करुन अहवाल नमुद करण्यात आला आहे. त्यापुर्वी, मुद्देमालाची वर्णन व त्याचे Exhibit number नमुद करण्यात आले आहेत. सदर Exhibit number नुसार त्यापुढे दिलेल्या टेबलमध्ये Inner layer major elements व outer layer major elements नमुद करण्यात आले आहे. त्यातील मजकूर योग्य व बरोबर आहे (सदर अहवालास **निशाणी ६२** देण्यात येते).*

**०५.** सदरचा अहवाल मी आमचे विभागीय प्रमुख यांना दाखविला. त्यांनी तो तपासुन तो योग्य असल्याची खात्री केली. त्यानंतर त्यांनी सही केली. त्यानंतर सदरचा

अहवाल आम्ही संबंधीत पोलीस ठाण्याला देण्याकरीता आमच्या जावक विभागाकडे पाठविण्यात आला. सदर अहवालानुसार माझा अंतिम निष्कर्ष असा आहे की, त्या मुद्देमालातील दागिन्यांमध्ये सोने धातुचे प्रमाण नव्हते. सदरचे दागिने हे सोन्याचे खोटे दागिने होते. सदरचा मी तपासलेला मुद्देमाल दाखविल्यास मी तो ओळखु शकतो.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास – प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून** –

**०६**. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासातील मी कथन केल्याप्रमाणे ''*माझा अंतिम निष्कर्ष असा आहे की, त्या मुद्देमालातील दागिन्यांमध्ये सोने धातुचे प्रमाण नव्हते. सदरचे दागिने हे सोन्याचे खोटे दागिने होते*'', असे निशाणी क्र. ६२ कडील अहवालात नमुद करण्यात आले नाही. साक्षीदार सांगतो की, तसा प्रोटोकॉल नाही.

**०७**. ***प्रश्नः*** *तसा प्रोटोकॉल नाही, हे तुम्ही चुकीचे कथन करीत आहात, हे बरोबर आहे का?*

***उत्तरः*** *अहवाल ज्या नमुन्यामध्ये देणे आवश्यक आहे, त्या नमुन्यात देण्यात आला आहे.*

**०८**. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालावर आमच्या विभागीय प्रमुखांची सही नाही. साक्षीदार सांगतो की, आमच्याकडील अहवालाच्या स्थळप्रतीवर विभागीय प्रमुखांची सही असते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडील नियमानुसार विभागीय प्रमुख यांनी अहवाल तपासुन तो बरोबर असल्याची खात्री करुन त्यांनी सही केल्याशिवाय आम्हाला अहवाल सादर करता येत नाही.

**०९**. ***प्रश्नः*** *त्यामुळे, विभागीय प्रमुख यांची सही अहवालाच्या मुळ प्रतीवर असणे आवश्यक असते हे बरोबर आहे का?*

***उत्तरः*** *प्रयोगशाळेच्या नियमानुसार अहवालाच्या स्थळ प्रतीवर विभागीय प्रमुख सही करतात. आमचे कडील सर्व अहवाल त्याप्रमाणेच जातात.*

१०. सदर प्रयोगशाळेचा नियम कोणता आहे, हे मी सांगु शकत नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, मी प्रयोगशाळेत नियुक्त होण्यापुर्वी पासुन सदरचा नियम चालत आलेला आहे. हे मला सांगता येणार नाही की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालाच्या शेवटच्या पानावर ***"Note - (2) Report shall not be reproduced except in full, without the written approval of the director"*** असे नमुद असुन त्यानुसार विभागीय प्रमुखांच्या सहीशिवाय मुळ अहवाल देता येत नाही, अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, रासायनिक विश्लेषक म्हणुन आम्ही अहवाल तयार केल्यानंतर तो तपासणीसाठी विभागीय प्रमुख यांच्याकडे देताना त्याची नोंद नोंदवहीमध्ये घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे, अहवाल विभागीय प्रमुखांना पाठविला असल्यास सदरची नोंद अहवालामध्ये ठेवली जाते.

११. ***प्रश्नः*** *तशी नोंद निशाणी क्र. ६२ कडील अहवालात नाही, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *त्याची नोंद अहवालात ठेवली जात नाही, ती नोंद नोंदवहीमध्ये स्वतंत्ररित्या केली जाते.*

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास मध्यात्तंराच्या सुट्टीपर्यंत तहकूब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.05 19:16:41 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक ०५.१२.२०२५
स्थळः देवरुख

**<u>मध्यात्तंरानंतर उलटतपास शपथेवर, प्रतिवादीतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून सुरु</u> –**

**१२**. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा मुद्देमाल एका स्टीलच्या डब्यात होता, ही बाब निशाणी क्र. ६२ कडील अहवालात नमुद करण्यात आली नाही. साक्षीदार सांगतो की, सदरचा डबा स्टीलचा होता की, दुसऱ्या धातुचा होता याबाबत मी परीक्षण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोन्याचे दागिने एखादया दुसऱ्या धातुच्या डब्यामध्ये बंद करुन काही कालावधीसाठी ठेवल्यास सोन्यावर त्या धातुचा परीणाम होतो.

**१३**. ***प्रश्नः*** *Energy Dispersive X-ray Fluorescence या उपकरणाचा वापर केल्याची बाब तुमच्या अहवालात नमुद करणे आवश्यक असताना तुम्ही ते केले नाही, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *तशी बाब नमुद करण्याची आवश्यकता नाही. त्याच उपकरणाचा वापर धातु परीक्षणासाठी केला जातो.*

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, Energy Dispersive X-ray Fluorescence हे उपकरण ज्यादिवशी मुद्देमाल तपासला त्यादिवशी उपकरण सुस्थीतीत होते, असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा प्रस्तुत अहवालासोबत मी जोडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कॉपर फॉईलद्वारे सदर उपकरणाचे त्यावेळी Calibration केले, अशी बाब माझ्या अहवालात नमुद नसुन तसा कागदोपत्री पुरावा देखील निशाणी क्र. ६२ कडील अहवालासोबत जोडला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालात टेबल स्वरुपात दिलेल्या *Inner layer major elements व outer layer major elements* मध्ये *Gold Copper and Zinc, Gold and Copper* असे काही ठिकाणी नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, Energy Dispersive X-ray Fluorescence या उपकरणाचा मॉडेल क्रमांक व नाव निशाणी क्र. ६२ कडील

अहवालात कोठेही नमुद करण्यात आले नाही. साक्षीदार सांगतो की, तशी पध्दत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तशी पध्दत नसल्याचे मी खोटे कथन करीत आहे.

**१५.** ***प्रश्नः*** *बाहेरील हवामानाचा सोने धातुवर परीणाम झाला आहे किंवा नाही यासाठी Pre-Search Test केली जाते, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *आमच्या प्रयोगशाळेत तशी चाचणी केली जात नाही.*

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, सदर परीक्षण करण्यासाठी आम्हाला External Independent Polymer Metal Analysis मागावावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, परीक्षण करताना किंवा परीक्षण करण्यापुर्वी मी छायाचित्रे घेतलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर मुद्देमाल पोलीस ठाण्यातुन प्राप्त झाल्यानंतर तो मुद्देमाल हाताळणारा मी एकमेव नव्हतो, आमचा इतर कर्मचारी वर्ग माझ्यासोबत होता. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेले दागिनेच विश्लेषणासाठी आमच्याकडे आले, हे मी निश्चीतपणे सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोने धातुबाबत परीक्षण करावयाचे झाल्यास Computer Test महत्वाची असते.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०२/२०२१ ते ३१/०८/२०२१ या कालावधीमध्ये मी माझ्या कार्यालयामध्ये कायम कर्तव्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कामाचा कालावधी पाच दिवसांचा आठवडा असतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर दिनांक २६/०२/२०२१ ते ३१/०८/२०२१ या दरम्यानच्या कालावधीतील प्रत्येक आठवडयातील सुट्टीच्या कालावधीचा उल्लेख निशाणी क्र. ६२ कडील अहवालात केलेला नाही.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालात अनुक्रमांक ३१८ पैकी कोणता मुद्देमाल कोणत्या तारखेला तपासला, याचा उल्लेख त्या अहवालात केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालात टेबलमध्ये

*Mass % of Gold* या प्रमाणे *Mass % of Copper and Zinc* असे नमुद करण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, *Mass % of Copper and Zinc* याबाबत परीक्षण केल्याचे निशाणी क्र. ६२ कडील अहवालात कोठेही नमुद करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, धातु मुद्देमाल तपासणीसाठी आल्यानंतर त्याचे वजन करुन पाहणे, सर्वप्रथम आवश्यक असते.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, मंगळसुत्र या स्वरुपाच्या दागिन्यात काळे मणी देखील समाविष्ठ होते. हे म्हणणे खरे आहे की, तसे काळे मणी असल्याचा उल्लेख मी निशाणी क्र. ६२ कडील अहवालात केला नाही.

२०. ***प्रश्नः*** *पोलीस ठाणेमार्फत पाठविलेल्या पत्रामध्ये (निशाणी क्र. ६९) शेवटच्या पानावर प्रश्नावलीमध्ये (क) सदर धातुमध्ये इतर धातुचे मिश्रण असल्यास त्यामध्ये कोणकोणत्या धातुचे मिश्रण आहे, त्याचे प्रमाणे काय आहे ? असे विचारले असल्याने तुम्ही ते तुमच्या अहवालात नमुद करणे आवश्यक होते, हे बरोबर आहे का?*

***उत्तरः*** *आमच्या विभागीय प्रमुखांनी सांगितल्यानुसार, सदरचे परीक्षण सोने धातु विषयक असल्याने अहवालात Mass % of Gold यामध्ये Inner layer व outer layer चा उल्लेख करण्यात आला आहे. इतर धातू विषयी नमुद करण्यात आले नाही.*

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, अशाप्रकारच्या पडताळणीसाठी पोलीस ठाण्याकडुन पत्र आल्यास त्यांच्या पत्रात नमुद असलेल्या प्रश्नावलीप्रमाणे अहवालात नमुद करणे आम्हाला आवश्यक असते.

२२. ***प्रश्नः*** *निशाणी क्र. ६९ कडील पोलीस ठाण्याच्या प्रश्नावलीनुसार तुम्ही अहवालामध्ये नमुद केले नाही, हे बरोबर आहे का ?*

***उत्तरः*** *खोटे सोने दागिन्याविषयी केस असल्याने मी Mass % of Gold नमुद केले आहे. इतर धातुंच्या प्रमाणाविषयी माझ्याकडे असलेल्या आलेखामध्ये मी त्याबाबत नमुद केले आहे.*

२३. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा आलेख निशाणी क्र. ६२ कडील अहवालासोबत किंवा आजतागायत न्यायालयात दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर पोलीस ठाण्याच्या पत्रामध्ये प्रस्तुतची केस खोटया सोन्याच्या दागिन्यांविषयी होती, अशी केसबाबत माहिती पुरविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मुद्देमाल परीक्षणासाठी आमच्या प्रयोगशाळेत प्राप्त झाल्यानंतर तो कोणत्या विभाग प्रमुखांकडे दिला जातो, याबाबत नोंदवही ठेवलेली असते.

२४. ***प्रश्नः*** *आजरोजी मुद्देमाल पाहिल्याशिवाय तुम्हाला अहवालात नमुद असलेल्या रासायनिक विश्लेषणाविषयी कथन करता येत नाही, हे बरोबर आहे का?*

***उत्तरः*** *सदर मुद्देमाल मी त्यावेळी पाहुन तो पडताळणी केलेला आहे. आज रोजी तो पाहण्याची गरज नाही.*

२५. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २६/०२/२०२१ रोजी विश्लेषण सुरु केल्यापासुन ते दिनांक ३१/०८/२०२१ रोजी पर्यंत विश्लेषण पुर्ण करण्याच्या कालावधीमध्ये सदरचा मुद्देमाल कोणाच्या ताब्यात व कोणत्या परीस्थीत ठेवण्यात आला, याचा उल्लेख अहवालामध्ये केलेला नाही. साक्षीदार सांगतो की, तितक्या बाबी अहवालात नमुद करणे शक्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, *तितक्या बाबी अहवालात नमुद करणे शक्य नाही,* हे मी खोटे सांगत आहे. सदरच्या कालावधीमध्ये विभागीय प्रमुख म्हणुन रा. रा. पवार हे कार्यरत होते.

२६. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ६२ कडील अहवाल हा आमचे

विभागीय प्रमुख यांच्या सांगण्यानुसार मी तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ६२ कडील अहवाल हा विहीत नमुन्यातील असुन त्याचा नमुना आमच्या कार्यालयात तयार असतो. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६२ कडील अहवालात पहिल्या पानावर ***1) Ref. No., 2) No. of exhibits received, 3) C.R. No., 4) Mode of receipt*** या पुढे आवश्यक ती माहिती भरण्यात आलेली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचा मुद्देमाल आमच्याकडे थेट न येता तो कोल्हापुर प्रयोगशाळेकडुन आमच्याकडे पाठविण्यात आला असल्याने तशी बाब नमुद करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अहवालामध्ये एखादया ठिकाणी खोडलेले असल्यास छोटी सही करणे गरजेचे असते. हे म्हणणे खरे नाही की, जे अक्षर खोडले आहे, त्याच्यावर छोटी सही केली जाते. साक्षीदार सांगतो की, त्याच्यावर छोटी सही केल्यास काय अक्षर खोडले आहे ते कळत नाही, त्यामुळे ते थोडया बाजुला करुन तेथे छोटी सही केली जाते.

२७. दिनांक ११/०६/२०१९ रोजी कोल्हापुर प्रयोगशाळेकडुन सदर मुद्देमाल आम्हाला प्राप्त झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, देवरुख पासुन कोल्हापुर प्रयोगशाळा व कोल्हापुर प्रयोगशाळेपासुन आमच्या प्रयोगशाळेत येईपर्यंत सदर मुद्देमालाबाबत काय झाले, याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ६८ व ६९ कडील अहवालात/पत्रात टाकलेल्या *Exhibit Numbers* मध्ये फरक आहे. साक्षीदार सांगतो की, मी त्याचे *Sub-division* केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तसे Sub-division करण्याचा मला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा अहवाल दाखल करुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.05 19:16:50 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०५.१२.२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

------------------------

**साक्षीदारांची सही व नाव**

---------------------------------------------

**दुरस्थ केंद्राचा समन्वयक यांची सही व नाव**

**(Co-ordinator's signature and name)**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 05/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 05/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 06/12/2025 |